# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

कालमर्यादा : दि. ०३/१०/२०१७

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/ २९७९

दिनांक : 26 SEP 2017

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता/संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र
पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यांत आलेल्या महाडिबीटी पोर्टलवर मुंबई विभागातील सर्व संस्थांना लॉगिन आयडी व पासवर्ड देण्याबाबत

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तशिसं/महाडीबीटी पोर्टल/२०१७/ १५७, दि. २१/०९/२०१७

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार कळविण्यांत येते की, सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मा. संचालक (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबईद्वारे नव्याने सुरु करण्यांत आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल द्वारे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेमार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

१. **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"**
२. **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना"**
३. **"उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना"** [शासन निर्णय - भाग-१ (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)]

उपरोक्त तिन्ही योजनांसाठी ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील http://mahadbt.gov.in या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

आपणांस कळविण्यांत येते की, मा. संचालक, (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडून मुंबई विभागांतर्गत व्यावसायिक शिक्षण संस्थांकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाला प्राप्त झालेले, सर्व महाविद्यालय/संस्थांचे क्लार्क व प्राचार्यासाठी (म्हणजे एका संस्थेसाठी महाडीबीटी पोर्टलचे दोन लॉगिन आयडी व पासवर्ड) लॉगिन आयडी व पासवर्ड दि. ०३/१०/२०१७ पर्यंत आपल्या कार्यालयातील सदर काम पाहणाऱ्या प्रतिनिधीस प्रत्यक्ष पाठवून घेऊन जाण्यास सांगावे.

**विभागीय कार्यालयामार्फत संबंधित संस्थेला लॉगिन आयडी व पासवर्ड देण्यात आल्यानंतर, दिला गेलेला पासवर्ड संस्थेने तावडतोब बदलून घ्यावा. सदर पासवर्ड न बदलता तोच ठेवल्यास याबाबतची सर्वतोपरी जबाबदारी संस्थांप्रमुख/प्राचार्यांची राहील. त्यामुळे लॉगिन आयडी पासवर्डच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती काळजी घेण्यांत यावी.** तसेच सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, आपणांस देण्यात येणाऱ्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेल्या अर्जांची छाननी करावयाची आहे. अचूक भरलेले ऑनलाईन अर्ज विहीत नियमानुसार पुढील कार्यवाहीसाठी फॉरवर्ड करावयाचे आहेत.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — २२६१७९६९ , फॅक्स — २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ / रजिस्टर्ड एडी

का.क्र.१८/तशिसं/महाडीबीटी पोर्टल/२०१७/१५७

दिनांक : २१/०९/२०१७

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवर आपल्या विभागातील सर्व संस्थांना लॉगिन आयडी व पासवर्ड देण्याबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मा. संचालक (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई द्वारे नव्याने सुरु करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल / **MahaDBT Portal** द्वारे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचेमार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

३) उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना [ शासन निर्णय - भाग-१ (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)]

उपरोक्त तिन्ही शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ - www.mahadbt.gov.in द्वारे भरुन घेण्याकरिता तरतूद महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की, मा. संचालक (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचेकडून या कार्यालयाला प्राप्त झालेले, आपल्या विभागातील येणाऱ्या सर्व महाविद्यालय/ संस्थांचे क्लार्क व प्राचार्यसाठी (म्हणजे एका संस्थेसाठी महाडीबीटी पोर्टलचे दोन लॉगिन आयडी व पासवर्ड ) लॉगिन आयडी व पासवर्ड या कार्यालयामार्फत ईमेलद्वारे आपणांस पाठविण्यात आलेले आहेत. सदरचे लॉगिन आयडी व पासवर्ड हे संबंधित ज्या त्या संस्थाना दिनांक ०३/१०/२०१७ पर्यंत देण्यात यावेत व त्याचा अहवाल सादर करावा. तसेच, **लॉगिन आयडीच्या सुरक्षिततेच्यासाठी योग्य ती काळजी घेण्यात यावी.**

विभागीय कार्यालयामार्फत संबंधित संस्थेला लॉगिन आयडी व पासवर्ड देण्यात आल्यानंतर, **दिला गेलेला पासवर्ड संस्थेला ताबडतोब बदलण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.** सदर पासवर्ड न बदलता तोच ठेवल्यास याबाबतची सर्वतोपरी जबाबदारी संस्थाप्रमुख/प्राचार्यांची राहील तसेच, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जांची संबंधित संस्थांचे क्लार्क व प्राचार्य यांचे लॉगिन आयडी व पासवर्ड वापरुन छाननी करण्याबाबत संस्थांना सूचना देण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन. )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत:-१) मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,चौथा मजला,मुंबई, यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय विस्तार भवन,सातवा मजला, मुंबई, यांना माहितीसाठी सविनय सादर.